खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला : मा. पांडुरंग बलकवडे

## शिवाजी महाराज की अष्टक्रांतियों से हुई स्वराज्य स्थापना : बलकवड़े

भास्कर न्यूज | खेड़



छत्रपति शिवाजी महाराज ने कृषि क्रांति, सामाजिक क्रांति, आर्थिक क्रांति, नौसेना क्रांति, गिरिदुर्ग और जलदुर्ग निर्माण की क्रांति, भाषा शुद्धि क्रांति तथा संस्कृति संरक्षण की सांस्कृतिक क्रांति के माध्यम से हिंदवी स्वराज्य और सुशासन की स्थापना की, यह मत विचारक पांडुरंग बलकवड़े ने किया।

वे खेड़ तहसील शिक्षण प्रसारक मंडल की ओर से हुतात्मा राजगुरु महाविद्यालय में आयोजित साहबराव बुट्टेपाटिल स्मृति व्याख्यानमाला में 'शिवरायांची अष्टक्रांति' (शिवाजी महाराज की आठ क्रांतियां) विषय पर बोल रहे थे।

संस्थाध्यक्ष एड. देवेंद्र बुट्टेपाटिल, संचालक बालासाहब सांडभोर, हीरामण सातकर, सुरेश टाकलकर, व्याख्यानमाला समिति अध्यक्ष एड. राजमाला बुट्टेपाटिल, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगले, डॉ. एस. एस. जगताप, उपप्राचार्य प्रो. वी. बी. दौंडकर तथा प्रबंधक एन. एम. शिंदे उपस्थित थे। पांडुरंग बलकवड़े ने कहा कि छत्रपति शिवाजी महाराज ने विदेशी आक्रमणों से भारत की संस्कृति, समाज और राष्ट्र की रक्षा का महान कार्य किया। वे भारतीय संस्कृति के पुनरुद्धारक थे। शिवाजी महाराज द्वारा स्थापित राष्ट्रवादी विचारधारा से प्रेरित होकर तानाजी मालुसरे और बाजीप्रभु देशपांडे जैसे वीरों ने अपने प्राणों की आहुति देकर राष्ट्र की रक्षा की। उन्होंने युवाओं से आह्वान किया कि शिवाजी महाराज द्वारा निर्मित स्वराज्य के आदर्श मार्ग को अपनाकर भारत को गौरवशाली बनाने के लिए सभी को संकल्पबद्ध होना चाहिए। कार्यक्रम का संचालन प्रो. ज्योति वालुंज ने किया, अतिथियों का परिचय डॉ. कीर्ति नितनवरे ने कराया और अंजलि बोंबले ने आभार व्यक्त किया।

दैनिक भास्कर
Fri, 30 January 2026
https://epaper.bhaskarhindi.com/c/79

# महाराजांच्या अष्टक्रांतीने स्वराज्याची निर्मिती

## स्मृती व्याख्यानमालेत बलकवडे यांचे प्रतिपादन



पांडुरंग बलकवडे

राजगुरुनगर, ता. ३१ : छत्रपती शिवाजी महाराजांनी कृषी क्रांती, सामाजिक क्रांती, अर्थ क्रांती, गनिमीकाव्याची युद्ध क्रांती, आरमार क्रांती, गिरीदुर्ग व जलदुर्ग निर्मितीची क्रांती, भाषाशुद्धी क्रांती आणि संस्कृतीरक्षणाची सांस्कृतिक क्रांती करून हिंदवी स्वराज्य निर्मिती केल्याचे प्रतिपादन पांडुरंग बलकवडे यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'शिवरायांची अष्टक्रांती' या विषयावर ते बोलत होते.

बलकवडे पुढे म्हणाले की, "परकीयांच्या आक्रमणापासून भारताची संस्कृती, समाज आणि राष्ट्राचे रक्षण करण्याचे महान कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. ते भारतीय संस्कृतीचे जिर्णोद्धारक आहेत. शिवरायांनी निर्माण केलेल्या राष्ट्रवादातून प्रेरणा घेऊन तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे यांनी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन स्वराज्याचे रक्षण केले."

"छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेले आदर्श सार्वकालिक अनुकरणीय आहेत. युद्धनीती ते भाषाशुद्धीपर्यंत प्रत्येक बाबतीत त्यांचे द्रष्टेपण दिसून येते. मर्यादित सैन्य आणि युद्धसामग्री असतानाही त्यांनी लढलेली आणि जिंकलेली युद्धे जगात अद्वितीय आहेत. शेती आणि शेतकऱ्यांविषयीचीचे त्यांचे धोरण राज्यकर्त्यांनी अनुसरले पाहिजे. त्यांनी केलेली आरमार आणि जलदुर्गांची उभारणी पाहता परकीय आक्रमणाचा धोका त्यांनी कैक वर्षे आधीच ओळखल्याचे कळते. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन आणि स्वराज्य निर्मितीच्या महामार्गाला आदर्श मानून हिंदुस्तान गौरवशाली करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध व्हावे," असे आवाहन बलकवडे यांनी केले. प्रा. ज्योती वाळुंज यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. कीर्ती नितनवरे यांनी परिचय करून दिला. तर, अंजली बोंबले हिने आभार मानले.

दै. सकाळ

केसरी

किरण खुडे (पत्रकार)

# छत्रपती शिवाजी महाराजांची अष्टक्रांतीने स्वराज्य निर्मिती

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** छत्रपती शिवाजी महाराजांनी कृषी क्रांती, सामाजिक क्रांती, अर्थ क्रांती, गनिमी काव्याची युद्ध क्रांती, आरमार क्रांती, गिरिदुर्ग आणि जलदुर्ग निर्मितीची क्रांती, भाषा-शुद्धी क्रांती आणि संस्कृतीच्या रक्षणाची सांस्कृतिक क्रांती करून हिंदवी स्वराज्य आणि सुराज्याची निर्मिती केल्याचे प्रतिपादन पांडुरंग बलकवडे यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत शिवरायांची अष्टक्रांती या विषयावर ते बोलत



होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सुरेश टाकळकर, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एस. एस. जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक एन. एम. शिंदे उपस्थित होते.

बलकवडे पुढे म्हणाले, परकीयांच्या आक्रमणापासून भारताच्या संस्कृती, समाज आणि राष्ट्राचे रक्षण करण्याचे महान कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. ते भारतीय संस्कृतीचे जीर्णोद्धारक आहेत. शिवरायांनी निर्माण केलेल्या राष्ट्रवादातून प्रेरणा घेऊन तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे यांनी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन राष्ट्राचेही रक्षण केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीच्या महामार्गाला आदर्श मानून हिंदुस्तान गौरवशाली करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध व्हा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाळुंज, परिचय डॉ. कीर्ती नितनवरे, तर आभार विद्यार्थीनी अंजली बोंबले हिने मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख